# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२८६/२०१०/१३

| | |
|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- ११/०५/२०१० |
| निकाल | दिनांक :- २३/०६/२०१० |

श्री सुभाष हरी मेटे,
भाऊ पाठक,एस.टी.कर्मचारी सहकारी संस्था मर्या,
प्लॉट क्र. आर.-६ क्र.२२ वडगाव, वाळूज,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११६०६९५१) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत
शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | विष्णु अं. हंबिरे | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्य/सचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ११/०५/२०१० रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०३/०६/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने घरगुती वापरासाठी महावितरण कंपनीकडुन दिनांक २०/०३/२००३ रोजी वीज कनेक्शन घेतले असुन त्याचा ग्राहक क्रमांक ४९००११६०६९५१ असा आहे. ग्राहकाने नविन कनेक्शनचा अर्ज कनिष्ठ अभियंता बजाजनगर शहर विभाग औरंगाबाद यांच्याकडे दिला होता.कनिष्ठ अभियंता यांचे फर्म कोटेशन नुसार ग्राहकाने पैशाचा भरणा केल्यानंतर त्यांना वीज पुरवठा जोडुन देण्यात आला. वीज ग्राहक राहत असलेल्या परीसरात ग्रामीण विभागातील एल.टी.लाईन व ट्रान्सफॉर्मर उपलब्ध असल्यामुळे त्यांना ग्रामीण विभागातील लाईनवरुन वीज पुरवठा करण्यात आला परंतु वीज देयक मात्र शहर विभागातुन देण्यात येत होते. वीज ग्राहकास कंपनीने ग्रामीण भागासाठी घोषीत केलेल्या वेळापत्रकानुसार भारनियमन होत होते. ग्राहकाने महावितरण कंपनीकडे तक्रार दाखल करुन वीज पुरवठा ग्रामीण विभागातुन असल्यामुळे वीज देयक सुध्दा ग्रामीण विभागातुन देण्यात यावे याबाबत विंनंती केली आहे परंतु त्याची विनंती मान्य करण्यात आली नाही. ग्राहकाने पुढे नमुद केले आहे की, माहे नोव्हेबर २००९ पासुन महावितरण कंपनीने औरंगाबाद शहर विभागातील ग्राहाकांसाठी शुन्य भारनियमन योजना सुरु केली असल्यामुळे शहर विभागातील ग्राहकांना प्रति युनिट ७५ पैसे ज्यास्त आकारणी वीज बिलातुन करण्यात येत आहे.त्यामुळे ग्राहकास भारनियमन होत असुनही ज्यास्त दराने वीज बिलाची आकारणी होत आहे.ग्राहकाने आपले वीज बिल ग्रामीण विभागातुन मीळण्याबाबत व माहे नोव्हेबर २००९ पासुन करण्यात आलेली ज्यास्तीची वीज आकाराणीची रक्कम परत मीळण्याबाबत आदेश देण्याची

विनंती मंचास केली,तसेच झालेल्या मानसीक त्रासापोटी नुकसान भरपाई म्हणुन रुपये १०,००० ची मागणी केली.

२) वरील प्रकारणाची सुनावणी ०३/०६/२०१० व ०८/०६/२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या दरम्यान नोडल अधिकारी श्री भारती व वीज ग्राहक उपस्थित होते.वीज ग्राहकाने आपली तक्रार वरील प्रमाणे कथन केली.नोडल अधिकारी यांनी लेखी जवाब सादर करुन सांगीतले की, ग्राहकाच्या परीसरात शहर विभागातील लघुदाब विद्युत वाहीनी उपलब्ध नसल्यामुळे त्यांना ग्रामीण भागातुन वीज पुरवठा देण्यात आला आहे.ग्राहकास महावितरण कंपनीने ग्रामीण भागासाठी घोषीत केलेल्या भारनियामन वेळापत्राका प्रमाणे भार नियामन होत आहे.ग्राहकाच्या अर्जानुसार त्यांना माहे जुन २०१० पासुन ग्रामीण उपविभागातुन वीज देयक सुरु करण्यात येईल असे सांगीतले. दोन्ही बाजुकडुनचे म्हणने ऐकुन घेतल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

३) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरुन असे दिसुन येते की,ग्राहकाचे घर औरंगाबाद महानगरपालीका क्षेत्रामध्ये येत असल्यामुळे त्यांनी कनिष्ठ अभियंता बजाजनगर शहर विभाग यांच्याकडे वीज पुरवठा मीळण्याबाबत अर्ज दाखल केला.कनिष्ठ अभियंता यांनी ग्राहक राहत असलेल्या भागात शहर विभागाची लघुदाब वीज वाहीनी उपलब्ध नसल्यामळे त्यांना ग्रामीण विभागाच्या वीज वाहीनी वरुन वीज पुरवठा करुन दिला परंतु ग्राहकास वीज देयक मात्र शहर विभातुन देण्यात येत होते.वरील बाबतीत ग्राहकाने वीज देयक ग्रामीण भागातुन देण्याबाबत महावितरण कंपनीकडे दिनांक १९/०५/२००६ पासुन अर्ज करुन पाठपुरावा केल्याचे दिसुन येत आहे.मा.वीज नियामक आयोगाच्या परवानगीने महावितरण कंपनीने औरंगाबाद शहर विभागातील वीज ग्राहकाकरीता माहे नोव्हेबर २००९ पासुन शुन्य भारनियमन योजना सुरु केली त्या योजने नुसार शहर विभातील ग्राहकांचे भार नियमन पुर्णपणे रद्द करुन त्यांचे वीज बिलामध्ये ७५ पैसे प्रति युनिट प्रमाणे ज्यास्तीचा वीज भार आकारण्यात आला.वरील योजनेमुळे

अर्जदारास भारनियमन असुनही शुन्य भारनियमन वीज आकार आकारण्यात येत आहे असे दिसुन येते.त्यामुळे ग्राहकाने केलेली तक्रार योग्य असल्याचे दिसुन येत आहे. ग्राहकास माहे डिसेंबर २००९ पासुन देण्यात आलेल्या वीज देयकाचे निरिक्षण केले असता त्यांना ७५ पैसे प्रति युनिट प्रमाणे ज्यास्तीची वीज आकारणी इतर आकार या सदराखाली वीज देयकात केल्याचे दिसुन येत आहे ती आकारणी अयोग्य असल्यामुळे ग्राहकास व्याजासह परत करावी असे मंचाचे मत आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीने वीज ग्राहकास ग्रामीण उपविभागाद्वारे वीज देयक निर्गमीत करावे.

२) माहे डिसेंबर २००९ पासुन ग्राहकाने भरणा केलेली शुन्य भारनियमन वीज आकारणी ६% व्याज दराने परत करावी.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |